मु. प्र. ... आवक क्र. प्र 576
दिनांक 06/02/17
म. गृ. नि. व क्षे. प्राधिकरण
आवक क्र. 348
दिनांक 02 FEB 2017
अभिकर्त्याची सही

**महाराष्ट्र शासन**

क्र.विविचा-२००७/प्र.क्र.५१ (भाग-१)/गृनिप
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१ जानेवारी,२०१७.

प्रति,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

Inward No. 401
Date 7/2/17
Dy. CE/PPD/MB

**विषय :- म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बीडीडी) चाळींच्या पुनर्विकासाबाबत. दि. १६.०९.२०१६ रोजी झालेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या चौथ्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.**

**संदर्भ :- आपले पत्र क्र. मुंमं/उमुअ/प्रनिस/न.क्र.बीडीडी ०७/२१५७/१६, दि.२३.१२.२०१६.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रान्वये मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकासासाठी गठित शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१६.०९.२०१६ रोजी झालेल्या चौथ्या बैठकीचे इतिवृत्त शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. सदर इतिवृत्तामध्ये नमुद केलेल्या निर्णयाच्या मजकूरामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा/बदल करुन त्यास मंजुरी देण्यात आली आहे :-

| अ.क्र. | विषय / चर्चा | म्हाडाच्या अहवालात नमूद इतिवृत्त | इतिवृत्तात करावयाची सुधारणा |
|---|---|---|---|
| १ | "शक्ती प्रदत्त समिती - बीडीडी चाळी पुनर्विकास" च्या तिसऱ्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करणे. | सदरील प्रारुप इतिवृत्ताबाबतची नस्ती गृहनिर्माण विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर सदर इतिवृत्त अंतिम करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, शक्ती प्रदत्त समिती यांनी सूचित केले. | ---- |
| २ | बीडीडी चाळीच्या एकंदर तीन ठिकाणांपैकी नायगांव व ना. म. जोशी मार्ग - परेल येथील दोन प्रकल्पाच्या आराखड्यांचे नियुक्त वास्तुशास्त्रज्ञांच्यावतीने | मा. मुख्य सचिव यांनी प्रकल्प सादरीकरणादरम्यान पुढील महत्वाच्या बाबी प्रकल्प आराखड्यात समाविष्ट करणेबाबत गांभीर्याने विचार व्हावा असे निर्देश दिले.<br>१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये झो. पु. योजनेमधील मार्गदर्शक तरतुदींचा अभ्यास करुन या | ---- |

COMB
VP & CEO/A
Dy. CE (PPD) Arch/MB
COMB
EE/PPD 7/2
Kulkarni 8/2

| | | | |
|---|---|---|---|
| | सादरीकरण करणे व दि. ३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयातील “शक्ती प्रदत्त समितीची कार्यकक्षा अ.क्र. ३ व ४” नुसार शक्ती प्रदत्त समितीने सुचविलेले बदल समाविष्ट करुन आराखड्यास मान्यता देणेबाबत व आराखडे मान्य झाल्यास प्रकल्पाच्या बांधकामासाठी जागतिक स्तरावर निविदा मागविण्यासाठी मंजूरी देणेबाबत. | प्रकल्पातील पुनर्वसन इमारतींकरीता पुढील १० वर्षासाठी Telescopic Taxation System तयार करण्यात यावी. जेणेकरुन रहिवाशांना टप्प्या - टप्प्याने कर भरणे सुलभ होईल.<br>२) आराखड्यात सोसायटी ऑफिस, क्लिनिक, डिस्पेन्सरी तसेच दररोज आवश्यक व जरुरी असलेल्या वस्तु व साहीत्य मिळण्याकरीता सुपर मार्केट अशा दैनंदिन जीवनातील महत्वाच्या बाबींसाठी तरतुद करावी.<br>३) इमारतीतील रहिवाशांचे पुनर्वसन गाळ्यातील स्थलांतरण सर्व दृष्टीकोनातून सुलभ होईल या दृष्टीने प्रकल्प नियोजनात तरतुदी करणेबाबत विचार व्हावा.<br>४) प्रकल्प आराखड्यात कचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने Garbage Disposal System बाबत सुस्पष्ट तरतूद करावी.<br>५) प्रकल्पातील एकूण गाळ्यांचा तपशील, पुनर्वसन गाळे व विविध गटातील विक्री गाळे यांचा स्पष्टपणे प्रकल्प अहवालात उल्लेख असावा.<br>प्रकल्प सादरीकरणानंतर उपाध्यक्ष / म्हाडा तथा सदस्य सचिव, शक्ति प्रदत्त समिती यांनी विनंती केली की, सादर केलेले प्रकल्प त्वरीत सुरु होण्याच्या दृष्टीने सादर केलेल्या प्रकल्प आराखड्यास (मास्टर प्लॅनला) तत्वत: मंजुरी देण्यात यावी, जेणे करुन म्हाडास Environmental Committee समोर प्रस्ताव सादर करणे व जागतिक निविदा मागविणे याबाबत अनुषंगिक कार्यवाही सुरु करणे शक्य होईल.<br>मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष यांनी निर्देश दिले की, DCR अंतीम होण्याच्या अधीन राहून नायगाव व ना. म. जोशी मार्ग - परेलचा प्रकल्प आराखडा (मास्टर प्लॅन) तत्वत: मान्य करण्यात येत आहे. तसेच प्रकल्प त्वरीत सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून म्हाडाने Enironmental Committee ला प्रस्ताव सादर करावा. | -----<br>----<br>---- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मा. मुख्य सचिव यांनी प्रकल्प अंमलबजावणी बाबत प्रकल्पातील विविध टप्प्यांचे वेळापत्रक निश्चित करण्याबाबत म्हाडास निर्देश दिले. तसेच या वेळापत्रकात पुढील महत्वाच्या टप्प्याबाबत खालीलप्रमाणे कालावधी निश्चित व्हावा, असे निर्देश दिले. | मा. मुख्य सचिव यांनी प्रकल्प अंमलबजावणी बाबत प्रकल्पातील विविध टप्प्यांचे वेळापत्रक निश्चित करण्या बाबत म्हाडास निर्देश दिले. तसेच या वेळापत्रकात पुढील महत्वाच्या टप्प्याबाबत खालीलप्रमाणे कालावधी निश्चित व्हावा, असे निर्देश दिले. |
| | | (१) ऑक्टोबरच्या अखेरपर्यंत नगर विकास विभागाने विकास नियंत्रण नियमावली ३३(९) (ब) अंतिम करावी. | (१) नगर विकास विभागाने ऑक्टोबर-२०१६ अखेरपर्यंत प्रारूप विकास नियंत्रण नियमावली ३३(९) (ब) अंतिम करणे. |
| | | (२) म्हाडाने विकास नियंत्रण नियमावली ३३(९)(ब) अंतिम झाल्यानंतर सात दिवसांमध्ये नियोजन प्राधिकरणास इमारतीचे सविस्तर नकाशे मंजूरीसाठी सादर करावेत. | (२) विकास नियंत्रण नियमावली ३३(९) (ब) अंतिम झाल्यानंतर म्हाडाने नियोजन प्राधिकरणास इमारतीचे सविस्तर नकाशे मंजूरीसाठी सादर करणे |
| | | (३) नियोजन प्राधिकरणाने इमारतींचे नकाशे दोन आठवड्याचे कालावधीत मंजूर करावेत. | (३) नियोजन प्राधिकरणाने इमारतींचे नकाशे दोन आठवड्याचे कालावधीत मंजूर करणे |
| | | (४) इमारतीचे नकाशास मंजूरी घेवून जागतिक स्तरावर निविदा काढण्यात याव्यात. | (४) शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेनंतर जागतिक स्तरावर निविदा काढण्याबाबत प्रक्रिया सुरू करणे. |

वरीलप्रमाणे सुधारणा करुन इतिवृत्त निर्गमित करण्यात यावे, ही विनंती

आपला,

(म. रा. पारकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन